# लक्षणे असलेल्या रुग्णांच्या संख्येत घट

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** मुंबईत करोनाच्या उपचाराधीन रुग्णांप्रमाणेच लक्षणे असलेल्या रुग्णांची संख्याही कमी होऊ लागली आहे. सद्य:स्थितीत केवळ १२ ते १५ टक्के रुग्णांमध्येच मध्यम स्वरूपाची लक्षणे दिसून येत आहेत.

एकूण रुग्णांपैकी २० टक्के रुग्णांमध्ये लक्षणे दिसतात आणि त्यांना रुग्णालयात दाखल करण्याची गरज असते. त्यापैकी काहींना प्राणवायू पुरवठ्याची किंवा अतिदक्षता विभागात दाखल करण्याची गरज असते. गेल्या काही दिवसांपासून मुंबईत नोंद होणाऱ्या रुग्णांपैकी बहुतांश रुग्ण हे लक्षणे नसलेल्या प्रकारातील आहेत. त्यामुळे पालिकेच्या करोना उपचार केंद्रातील खाटा देखील मोठ्या प्रमाणावर रिक्त राहात आहेत. कारण अशा बाधितांना घरीच विलगीकरणात राहता येते. सध्या दरदिवशी सरासरी हजार-बाराशे रुग्णांची नव्याने नोंद होत आहे.



### २४ जूनची आकडेवारी

- उपचाराधीन रुग्ण -२८,६५३
- लक्षणे नसलेले रुग्ण -१६,८६२
- लक्षणे असलेले रुग्ण -१०,८२२

### २३ जुलैची आकडेवारी

- उपचाराधीन रुग्ण - २२,८००
- लक्षणे नसलेले रुग्ण - १५,९६८
- लक्षणे असलेले रुग्ण - ६,३८०

त्यातील केवळ दीडशे ते दोनशे रुग्णांना रुग्णालयात दाखल करावे लागते आहे.

सुरुवातीच्या काळात जेव्हा करोनाचा संसर्ग वेगाने होत होता, तेव्हा खाटा कमी पडत होत्या. कारण लक्षणे असलेल्या रुग्णांची संख्या अधिक होती. मात्र आता लक्षणे असलेल्या रुग्णांची संख्या कमी झाल्यामुळे खाटाही रिक्त राहू लागल्या आहेत.

२३ जुलैला मुंबईत २२,८०० उपचाराधीन रुग्ण होते. त्यापैकी लक्षणे असलेल्या रुग्णांची संख्या ६,३८० होती. तर महिनाभरापूर्वी म्हणजे २४ जूनला २८,६५३ उपचाराधीन रुग्ण होते. त्यापैकी १०,८२२ रुग्णांना लक्षणे दिसत होती. थोडक्यात महिनाभरात लक्षणे असलेल्या रुग्णांची संख्या खूपच कमी झाली आहे.

गेल्या काही दिवसांपासून पालिकेने चाचण्यांची संख्या वाढवली आहे. प्रतिजन चाचण्याही होऊ लागल्या आहेत. त्यामुळे नव्या रुग्णांची नोंद होत आहे. मात्र त्यात लक्षणे नसलेल्या रुग्णांची संख्या अधिक आहे. तर गंभीर रुग्णांची एकूण संख्या सरासरी हजारपर्यंत आहे. सध्या पालिकेकडे एकूण २२,१५७ खाटा असून त्यापैकी १२,००२ खाटा रुग्णांनी व्यापलेल्या आहेत. तर ७,०१० खाटा रिक्त आहेत. अतिदक्षता विभागाच्या २१४, कृत्रिम श्वसन उपकरणाच्या १०९ खाटा रिक्त आहेत.

## मुंबईत ७३ टक्के रुग्ण करोनामुक्त

**मुंबई :** मुंबईत शुक्रवारी करोनाच्या १,०६२ नवीन रुग्णांची नोंद झाली असून ५४ रुग्णांचा मृत्यू झाला आहे. मृतांची संख्या सहा हजारांच्याजवळ पोहोचली आहे, तर ७३ टक्के रुग्ण करोनामुक्त झाले आहे.

सलग तीन दिवसांपासून मुंबईत एका दिवसात जेवढ्या रुग्णांची नोंद होते, त्यापेक्षा जास्त रुग्ण बरे होऊन घरी जात आहेत. शुक्रवारी १,०६२ रुग्णांची नोंद झाली, तर १,१५८ रुग्ण बरे होऊन घरी गेले. एकूण बाधितांचा



आकडा एक लाख सहा हजार ८९१ झाला आहे. ७८ हजार २६० रुग्ण करोनामुक्त झाले आहेत.

शुक्रवारी ५४ रुग्णांच्या मृत्यूची नोंद झाली असून मृतांची एकूण संख्या ५,९८१ वर गेली आहे. मृतांमध्ये ३७ पुरुष तर १७ महिला होत्या. सहा रुग्णांचे वय ४० वर्षांखाली होते, तर ३७ रुग्णांना दीर्घकालीन आजार होते.

मुंबईतील रुग्णवाढीचा सरासरी दर १.०९ टक्क्यांपर्यंत कमी झाला आहे. रुग्ण दुपटीचा कालावधी सरासरी ६४ दिवसांवर गेला आहे. मुंबईतील प्रतिबंधित वस्त्यांची संख्या कमी झाली असून आता केवळ ६२५ वस्त्या प्रतिबंधित आहेत. ६१०८ इमारती प्रतिबंधित आहेत. मुंबईत बोरिवली, कांदिवली आणि नानाचौक–मलबार हिल या भागात रुग्णवाढ सर्वाधिक आहे.

# राज्यात करोना मृत्यूदर शून्यावर आणण्याचे उद्दिष्ट : मुख्यमंत्री

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

## 'औषधांबाबत मार्गदर्शक सूचना असाव्यात'



**मुख्यमंत्री उद्धव ठाकरे म्हणाले की, मुंबईत टास्क फोर्सने चांगले काम केले आहे. सुरुवातीला औषधे नव्हती, आता काही विशेष औषधे उपलब्ध झाली आहेत. त्यामुळे सर्वत्र या औषधांच्या उपयोगासाठी मार्गदर्शक तत्त्वे आवश्यक आहेत. धारावी आणि वरळीत औषधे नसतानाही तेथील प्रादुर्भाव रोखण्यात यश आले. आता काही विशेष औषधे असून त्याच्या उपचाराबाबत सर्वसमावेशक मार्गदर्शक तत्त्वे लागू केली जावीत.**



**मुंबई :** राज्यात शहरी भागांच्या तुलनेत ग्रामीण भागात वैद्यकीय सुविधा मर्यादित आहेत. त्यामुळे या सुविधांमध्ये झपाट्याने वाढ करतानाच कोणत्याही परिस्थितीत गाफील न राहता मोठ्या प्रमाणावर तपासण्या करून करोनाबाधितांचा मृत्यूदर शून्यावर आणणे हे एकमेव उद्दिष्ट आहे. यादृष्टीने विविध जिल्ह्यांमधील तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकांनी मुंबईच्या पथकातील ( टास्क फोर्स) डॉक्टरांच्या संपर्कात राहून त्यांचे मार्गदर्शन घ्यावे, अशा सूचना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी शुक्रवारी दिल्या.

मुख्यमंत्र्यांनी दूरचित्र संवादाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाशी संवाद साधला. करोना रुग्णांवर सर्व जिल्ह्यांमधून योग्य वैद्यकीय उपचार व्हावेत, जेणे करून रुग्ण बरे होण्याचे प्रमाण वाढेल तसेच मृत्यूदर देखील झपाट्याने कमी होऊ शकेल, असे ते म्हणाले. मृत्यूदर कमी नाही, तर शून्यावर आणणे हेच आपले उद्दिष्ट असले पाहिजे. त्यादृष्टीने नेमकी उपचारपद्धती, उपचारांमध्ये सर्व जिल्ह्यांत एकसूत्रीपणा आणि समानता असणे आवश्यक आहे. म्हणूनच जिल्ह्यांतील तज्ज्ञ डॉक्टरांचा गट आणि मुंबईतील तज्ज्ञांची एकत्रित बैठक आयोजित केल्याचे मुख्यमंत्र्यांनी प्रारंभीच स्पष्ट केले.

उपचारांच्या बाबतीत वेळोवेळी मार्गदर्शक तत्त्वे दिली जातात, त्याकडे सर्वांनी काळजीपूर्वक लक्ष द्यावे. नको तिथे अनावश्यक औषधे देऊ नयेत. अडचण येईल तेव्हा तत्काळ आमच्याशी संपर्क साधा, असे मुंबईतील टास्क फोर्सचे प्रमुख डॉ. संजय ओक यांनी सांगितले.

डॉ. तात्याराव लहाने यांनी या बैठकीचे सूत्रसंचालन केले.

## ठाणे जिल्ह्यात १,५२४ नवे रुग्ण

**ठाणे :** जिल्ह्यात शुक्रवारी १ हजार ५२४ नवे करोनाबाधित आढळून आले आहेत. त्यामुळे जिल्ह्यात करोनाची लागण झालेल्या एकूण रुग्णांची संख्या ७५ हजार ४४६ वर पोहोचली आहे. तर, दिवभरात ३७ करोनारुग्णांचा मृत्यू झाल्याने जिल्ह्यातील मृतांचा आकडा २ हजार ८३ इतका झाला आहे.

ठाणे जिल्ह्यात शुक्रवारी दिवसभरात १ हजार ५२४ नवे रुग्ण नोंदले गेले. त्यामध्ये कल्याण-डोंबिवली शहरातील ३४२, नवी मुंबईतील ३०८, ठाणे शहरातील २८५, ठाणे ग्रामीणमधील २००, मीरा-भाईंदरमधील १६०, उल्हासनगर शहरातील ९२, बदलापूरमधील ५२, अंबरनाथमधील ५० आणि भिवंडीमधील ३५ रुग्णांचा समावेश आहे.

शनिवारी जिल्ह्यात ३७ जणांचा करोनामुळे मृत्यू झाला आहे. त्यामध्ये कल्याण-डोंबिवलीतील ८, भिवंडीतील ८, नवी मुंबईतील ५, ठाण्यातील ४, तर अंबरनाथ, उल्हासनगर, मीरा-भाईंदर आणि ठाणे ग्रामीणमधील प्रत्येकी ३ रुग्णांचा समावेश आहे.

आरपी-संजीव गोयंका ग्रुप
Growing Legacies
firstsource Stay Ahead
**फर्स्टसोर्स सोल्युशन्स लिमिटेड**
**सीआयएन**: एल६४२०२एमएच२००१पीएलसी१३४१४७
**नोंदणीकृत कार्यालय**: ५वा मजला, परडीजीम 'बी' विंग, माइंडस्पेस, लिंक रोड, मालाड (पश्चिम), मुंबई–४०००६४, भारत
**दूर.**: +९१ (२२) ६६६६०८८८ **फॅक्स**: +९१ (२२) ६६६६०८८७
**वेब**: www.firstsource.com
**ई–मेल**: complianceofficer@firstsource.com
**सूचना**
सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अॅण्ड डिसक्लोजर रिक्वायरमेंट्स) नियमावली, २०१५ च्या नियम ४७ च्या मान्यतेच्या अनुसार याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, ३० जून २०२० रोजी संपलेल्या त्रैमासिकासाठी लेखापरीक्षित एकमेव आणि एत्रिकृत वित्तीय निष्कर्ष अन्य बाबींसह विचार करण्यासाठी आणि संमत करण्यासाठी कंपनीच्या संचालक मंडळाची बैठक बुधवार, १२ ऑगस्ट, २०२० रोजी घेण्यात येणार आहे.
सदर सूचना कंपनीच्या संकेतस्थळावर म्हणजेच www.firstsource.com वर आणि बीएसई लि. च्या (www.bseindia.com) आणि एनएसई (www.nseindia.com) या संकेतस्थळावरदेखील उपलब्ध आहे.
**संचालक मंडळाच्या आदेशाद्वारे**
**सही/–**
**दिनांक**: जुलै २४, २०२०
**पूजा नंबियार**
**ठिकाण**: मुंबई
**कंपनी सचिव आणि कम्प्लायन्स अधिकारी**

Imagicaa
**इमॅजिकावर्ल्ड एन्टरटेनमेन्ट लिमिटेड**
**( पूर्वीची अॅडलॅब एन्टरटेनमेन्ट लिमिटेड )**
**नोंदणीकृत कार्यालय**: ३०/३१, सांगडेवाडी, खोपोली–पाली रोड, तालुका खालापूर, जिल्हा रायगड ४१०२०३, महाराष्ट्र, भारत
**कॉर्पोरेट कार्यालय**: ९वा मजला, लोटस बिझनेस पार्क, न्यू लिंक रोड, अंधेरी (पश्चिम), मुंबई ४०००५३, महाराष्ट्र, भारत.
**सीआयएन**: एल९२४९०एमएच२०१०पीएलसी१९९९२५,
**फोन**: +९१ २२ ४०६८००००; **फॅक्स**: +९१ २२ ४०६८००८८
**ईमेल**: compliance@imagicaaworld.com, **वेबसाइट**: www.imagicaaworld.com
**सूचना**
सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अॅण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेन्ट्स) रेग्युलेशन्स, २०१५च्या विनियम २९ व ४७ अन्वये याद्वारे सूचना देण्यात येते की, अन्य बाबींबरोबर, ३१ मार्च २०२० रोजी संपलेल्या तिमाहीचे आणि वर्षाचे कंपनीचे लेखापरिक्षित स्वायत्त व एकत्रीकृत वित्तीय निष्कर्ष विचारात घेण्यासाठी आणि संमत करण्यासाठी बुधवार, २९ जुलै २०२० रोजी कंपनीच्या संचालक मंडळाची २७ वी सभा घेण्याचे नियोजिले आहे.
उक्त सूचना कंपनीच्या वेबसाइटवर www.imagicaaworld.com मध्येसुद्धा उपलब्ध आहे आणि स्टॉक एक्स्चेंजिसच्या वेबसाइट्सवर www.nseindia.com व www.bseindia.com मध्येसुद्धा पाहता येईल.
**इमॅजिकावर्ल्ड एन्टरटेनमेन्ट लिमिटेड करिता**
(पूर्वीची अॅड्लॅब्ज एन्टरटेनमेन्ट लिमिटेड)
स्वाक्षरी/–
स्थळ: मुंबई
**दिव्यता रावल**
दिनांकित: २४ जुलै २०२०
कंपनी सचिव

TATA
**TATA STEEL LIMITED**
Registered Office: Bombay House, 24, Homi Mody Street, Fort, Mumbai - 400 001, India
Tel.: +91 22 6665 8282
E-mail: cosec@tatasteel.com Website: www.tatasteel.com
CIN: L27100MH1907PLC000260
**जाहीर सूचना – ११३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा**
याद्वारे कळविण्यांत येते की, कोव्हीड–१९ साथरोगाचा प्रसार लक्षांत घेऊन कंपनी अधिनियम, २०१३ च्या प्रयोज्य तरतुदी आणि त्या अंतर्गत बनवलेले नियम सह वाचता निगम व्यवहार मंत्रालयाने (**''एमसीए''**) जारी केलेली दिनांक ८ एप्रिल, २०२० चे जनरल सर्क्युलर क्र. १४/२०२०, दिनांक १३ एप्रिल, २०२० चे क्र. १७/२०२०, दिनांक ५ मे, २०२० चे क्र. २०/२०२० (एकत्रित उल्लेख **'एमसीए सर्क्युलर्स'**) आणि सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया ने जारी केलेले दिनांक १२ मे, २०२० चे सर्क्युलर क्र. सेबी/एचओ/सीएफडी/सीएमडी/१/सीआयआर/पी/२०२०/७९ (**'सेबी सर्क्युलर'**) च्या अनुपालनांत टाटा स्टील लिमिटेड (**'कंपनी'**) च्या सभासदांची ११३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (**'एजीएम/सभा'**) टु–वे व्हिडिओ कॉन्फरन्स (**'व्हीसी'**)/अदर ऑडिओ व्हिज्युअल मिन्स (**'ओएव्हीएम'**) मार्फत बोलावण्यांत येईल.
एजीएम बोलावण्याच्या सूचनेत मांडलेले कामकाज करण्यासाठी नॅशनल सिक्युरिटीज अँड डिपॉझिटरीज लिमिटेड ('एनएसडीएल') ने पुरवलेल्या व्हीसी/ओएव्हीएम सुविधेमार्फत टाटा स्टील लिमिटेड च्या सभासदांची ११३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा ('एजीएम') गुरुवार, २० ऑगस्ट, २०२० रोजी दु. ३.०० वा. (भा.प्र.वे.) होईल.
कंपनीच्या एकात्मिक अहवाल आणि आर्थिक वर्ष २०१९–२० साठीचे वार्षिक लेखे (**'एकात्मिक अहवाल'**) याहस एजीएमच्या सूचनेची ई–कॉपी कंपनीची वेबसाईट www.tatasteel.com वर आणि एनएसडीएल ची वेबसाईट www.evoting.nsdl.com वर उपलब्ध असेल. त्याशिवाय, स्टॉक एक्सचेंजेस म्हणजेच बीएसई लिमिटेड (**'बीएसई'**) आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड (**'एनएसई'**) च्या वेबसाईटस अनुक्रमे www.bseindia.com आणि www.nseindia.com येथील संबंधित सेक्शन मध्ये सुध्दा एजीएमची सूचना उपलब्ध असेल व पाहता येईल.
सभासद **फक्त** व्हीसी/ओएव्हीएम सुविधेमार्फत एजीएमला हजर राहून त्यामध्ये सहभागी होऊ शकतात, त्याचे तपशील सभेच्या सूचनेत कंपनीकडून पुरवले जातील. त्यानुसार, कृपया ध्यानांत ठेवावे की, कोव्हीड–१९ महामारी च्या संबंधात शासकीय प्राधिकाऱ्यांनी जारी केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांच्या पालनाची सुनिश्चित करण्यासाठी व्यक्तीशः कंपनीच्या ११३ व्या एजीएम मध्ये हजर राहून सहभागी होण्याची कोणतीही तरतूद नाही. व्हीसी/ओएव्हीएम मार्फत सभेस उपस्थित राहाणाऱ्या सभासदांना कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम १०३ अन्वये गणपूर्ती साठी विचारात घेतले जाईल.
एकात्मिक अहवालासह एजीएमची सूचना त्या सभासदांना इलेक्ट्रॉनिक पध्दतीने पाठवली जाईल ज्यांचे ई–मेल अॅड्रेसेस कंपनी/रजिस्ट्रार्स अँड ट्रान्सफर